**प्रेस नोट** दि.१४/०७/२०१९

**कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**कोरेगाव पार्क - उच्चभ्रू परिसरातील हॉटेलमध्ये सुरू असलेल्या जुगार अड्डयावर छापा, जुगार खेळणा-या इसमांवर व हॉटेल चालक/मालक यांचेवर कारवाई**

दि.१३/०७/२०१९ रोजी कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार दिनेश शिंदे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, काही इसम हॉटेल मींट रूम नं.३०८ येथे पैशावर पोकर नावाचा जुगार खेळत आहेत. सदर बातमीवरून मा.श्री.बच्चन सिंग साो., पोलीस उप आयुक्त, परि.२, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.मदन बहाद्दरपुरे, अधिकारी, स्टाफ व दोन पंचासह हॉटेल मींट येथे जावून २२.३० वा. छापा टाकला असता तेथील रूम नं.३०८ येथे इसम नामे (१) आशिष सतीश मित्तल, रा. विमानगर, पुणे (२) ऋषभ मदन गुप्ता, रा. विमाननगर, पुणे (३) आादित्य सुर्यप्रकाश अगरवाल, रा. औंध, पुणे (४) आशिष नंदकिशारे, अगरवाल, रा. मार्केटयार्ड, पुणे (५) गौरव सूरज अगरवाल, रा. ऊंड्री, पुणे (६) अभिषेक संतोष अगरवाल, रा. सोपानबाग, पुणे (७) सूरज सुशील गोयल, रा. मार्केटयार्ड, पुणे (८) गोविंद लक्ष्मीकांत पारेख, रा. एन.आय.बी.एम. रोड, पुणे (९) जयेश मोहन गुप्ता, रा. कल्याणीनगर, पुणे असे रूममधील बेडवर गोलाकार बसून पैशावर पोकर नावाचा जुगार खेळताना मिळून आले आहेत. सदर ठिकाणी जुगार खेळण्यासाठी जुगाराची साधने मिळून आली असून, त्यात पोकर रेंज नावाचे जुगाराचे साहित्य असलेली आयताकृती पेटी, एक विदेशी दारूची बॉटल ब्लॅक लेबल कंपनीची विना परवाना कब्जा बाळगली असताना तसेच सदर ठिकाणी बेकायदेशीरपणे हुक्का पिण्यासाठी तीन हुक्का पॉट व रोख रक्कम असा एकूण ३२,४९० रू. चा माल मिळून आला असून तो पंचासमक्ष जप्त करण्यात आलेला आहे. वरील नऊ इसमांविरूद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम ४, ५ सह महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६६ (ब) सह सिगारेट व इतर तंबाखूजन्य उत्पादने अधिनियम कलम ४, २१ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे व जुगार खेळणाया नऊ इसमांना सदर गुन्हयात अटक करण्यात आलेले आहे. सदरचे इसम हे पुण्यातील व्यापारी आहेत. तसेच हॉटेल मींटचे मालक व मॅनेजर यांचेविरूद्ध कायदेशीर कारवाई चालू आहे. नमूदची कारवाई ही मा. श्री. बच्चन सिंग साो., पोलीस उप आयुक्त, परि.२, पुणे शहर, मा. डॉ.प्रीती टिपरे, सहा. पोलीस आयुक्त, लष्कर विभाग, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली मा. श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.गणेश माने, पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक किरण लोंढे, व पोलीस कर्मचारी दिनेश शिंदे, संदिप गायकवाड, अमोल सोनावणे, रियाज शेख, विनोद साळुंके, शरद वाघमारे, अशोक हरीहर यांनी केलेली आहे.

(मदन बहाद्दरपुरे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे